# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४००००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स नं. २२६९२१०२

तार- EDUTECH E_mail desk15@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


**न्यायालयीन प्रकरण**

क्रमांक : १५/तंशिसं/सुरक्षा रक्षक/न्याया./२०११/ ९८३

दिनांक : २ [illegible] २०११

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/ नागपूर

विषय : **रिट याचिका क्रमांक ३५८१/२०१०**

**महाराष्ट्र शासन व इतर**

**विरुध्द**

**श्री. एन. के.रेहपाडे, निरिक्षक, नागपूर जिल्हा, सुरक्षा रक्षक निवड मंडळ, नागपूर**

संदर्भ : शासन पत्र क्रं.न्याप्रआ-२०११/(५१/११)१६७/तांशि-३, दि. २४.०८.२०११

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने शासनास खालील मुद्दयाबाबतची माहिती तात्काळ सादर करावयाची असल्याने सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांच्या कार्यालयासह अधिनस्त सर्व शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये / तंत्रनिकेतने व तत्सम संस्था यांची माहिती या संचालनालयास तात्काळ फॅक्सने व स्पीड पोस्ट/ व ईमेलवर दि. २५.८.२०११ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत उपलब्ध करुन दयावी.

१) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सर्व विभागीय कार्यालयांतर्गत सुरक्षा रक्षक मंडळाचे पंजीकृत सुरक्षा रक्षकांच्या सेवा घेणा-या संस्था/ कार्यालयाची संपूर्ण माहिती. (सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी सुरक्षा रक्षक मंडळाना पंजीकृत करुन त्यांच्या कार्यालयात व त्यांचे अधिनस्त संस्थांमध्ये सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केलेली असल्यास किंवा प्राचार्यांनी स्वतंत्रपणे संस्था स्तरावर सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केलेली असल्यास असे स्वतंत्ररित्या माहिती कळविण्यात यावी.)

२) सर्व विभागीय कार्यालयामार्फत कंत्राटी पध्दतीवर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची संख्या व त्यांना देय ठरणारे वेतन तथा अनुषंगिक लाभाबाबतची संपूर्ण आकडेवारी सहित माहिती.

३) सुरक्षा रक्षक मंडळाने महाराष्ट्र राज्य खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१, अंतर्गत संस्थाशी केलेला पत्रव्यवहार / कराराची माहिती.

४) मेस्को या संस्थेकडून सा.प्र. विभागाच्या शासन निर्णय क्र..मासैमं/ १०९९ / २३९० /प्र.क्र२४४ / ९९/२८, दि. १४ नोव्हेंबर २००२ अन्वये घेण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांच्या सेवा ज्या संस्थात कार्यरत आहेत त्यांची यादी व या कर्मचा-यांना देय ठरणारे वेतन व त्याबाबतचे करारनामा.

५) सदर सुरक्षा रक्षकांचे वेतन / मोबदला " कंत्राटी सेवा (१०) " की, वेतन (०१) हया नियमित उद्दिष्टाखाली देण्यात येते की सदरहू उद्दिष्टाचा खर्च स्वीय प्रपंजी लेख्यातून भागविला जातो का?

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
26 AUG 2011
१०७४

(डॉ. सुभाष महाजन)

प्र.संचालक,

तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

जा.क.विकापु/आस्था-अ/सुरक्षा रक्षक/न्याया/२०११/ ६३३१

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

दिनांक/- 29 AUG 2011

फॅक्सव्दारे (तात्काळ)

प्रति,

संचालक / प्राचार्य,

सर्व शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय / तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी. त्यांना कळविणेत येते की, संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रातील मुद्याबाबतची माहिती तात्काळ **आज दिनांक २९/८/२०११ रोजी ,तंत्रशिक्षण, मुंबई यांना तसेच या कार्यालयास फॅक्सव्दारे पाठविण्यात यावी**

(बी.डी.मिसाळ)

प्रशासकीय अधिकारी

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- श्री. शिंदे प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण वि.का. पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.